# कृपया खालील बाबींची नोंद घ्यावी :-

१) सोबत प्रसिध्द केलेली यादी ही महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेच्या पंचवार्षिक निवडणूका २०१५-२०२० ची मतदार यादी नसून महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेमध्ये दि. ३१ जानेवारी २०१५ अखेरपर्यंत नोंदणीकृत असणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांची यादी आहे.

२) नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना मतदान हक्कांपासून वंचित रहावे लागू नये म्हणून ज्यांचे नुतनीकरण झालेले नाही किंवा ज्यांचे नुतनीकरण जून २०१५ अखेरपर्यंत संपते आहे, त्यांना प्राथमिक मतदार यादी प्रसिध्द करण्यापूर्वी आपल्या नोंदणीचे नुतनीकरण करुन घेण्यासाठी अधिक अवधी मिळावा म्हणून ही यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

३) परिषदेच्या निवडणूकीकरिता प्राथमिक मतदार यादी निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना जाहिर झाल्यानंतर प्रसिध्द करण्यात येईल. अधिसूचनेतील प्राथमिक मतदार यादीवर आक्षेप किंवा हरकती नोंदविण्यासाठी व त्यावेळीही ज्यांनी नुतनीकरण केले नसेल त्यांना नुतनीकरण करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात येईल.

४)परिषदेतील नोंदणीकृत अनेक वैद्यकीय व्यावसायिकांनी परिषदेमध्ये नोंदणी करताना/ नुतनीकरण करताना नोंदविलेले पत्ते अपूर्ण आहेत किंवा ते पत्ते पूर्णपणे बदललेले आहेत, परंतु वैद्यकीय व्यावसायिकांनी त्याची परिषदेकडे नोंद केलेली नसल्यामुळे त्यांना केंद्रिय होमिओपॅथी परिषद निवडणूक २०१४ च्या मतपत्रिका मिळू शकल्या नाहीत, अशी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना त्या बाबतीत योग्य ती खबरदारी घेऊन सुधारण करण्यास अवधी मिळावा म्हणून ही यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

५) निवडणूक घेण्याकरिताच्या सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करण्याची कार्यवाही परिषद स्तरावर चालू असून निवडणूक कार्यक्रम अधिसूचना जाहिर होण्याकरिता अजून किमान ६० दिवसांचा वेळ लागणार आहे. त्यानंतर प्राथमिक मतदार यादी प्रसिध्द होणे व त्यामधील दुरुस्तीकरिता किमान १ महिन्याचा कालावधी याचा विचार करुन सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी आपला मतदान हक्क सुरक्षित राखण्याची योग्य ती कार्यवाही करण्यासाठी किमान ३ महिन्याची मुदत मिळणार आहे.

परिषद स्तरावर चालू असलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने राज्यातील विविध संघटनांनी निवेदने दिली आहेत, त्यातील मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक त्या ठिकाणी शासनाचे मार्गदर्शन घेऊन अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यामुळे परिषदेकडे नोंदणीकृत असणाऱ्या सर्व वैद्यकीय व्यावसायिकानी आपला मतदानाचा हक्क सुरक्षित राहील व मतदान प्रक्रिया पारदर्शीपणे व सुस्थितीत पार पाडण्याची जबाबदारी परिषदेस चोख रितीने पार पाडता येईल याची खात्री बाळगावी.

६) अनेक वैद्यकीय व्यावसायिकांनी नोंदणी नुतनीकरणाचा "जे" फॉर्म भरुन पाठविला आहे. परंतु त्या सोबत त्यांचे मूळ नोंदणी प्रमाणपत्र पाठविलेले नसल्याने त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण होऊ शकलेले नाही. याबाबतीत परिषदेकडून अनेक वेळा पत्रव्यवहार व दूरध्वनीवरुन सूचना देऊनही मूळ प्रमाणपत्र दाखल केले जात नाही. या सर्व वैद्यकीय व्यावसायिकांनी त्यांचे मूळ नोंदणी प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण होणार नाही याची नोंद घेऊन तातडीने मूळ प्रमाणपत्र परिषदेस पाठविण्यात यावे.